प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय
"वनभवन" रामगिरी रोड, सिव्हील लाईन, नागपूर-४४०००१

क्रमांक-कक्ष-७(२)/वकनि/प्र.क्र.१२(०७-०८)भाग- २/११६ /१५-१६
नागपूर- ४४०००१, दिनांक ०८ /०६ /२०१५

प्रति,
अध्यक्ष विभागीय समिती,
महाराष्ट्र राज्य वनकर्मचारी कल्याण निधी तथा
अपर प्रधान मुख्य मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव/कार्य आयोजना) सर्व
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) (सर्व)
मुख्य वनसंरक्षक तथा उपमहासंचालक,सामाजीक वनीकरण (सर्व)

विषय:- महाराष्ट्र राज्य वनकर्मचारी कल्याण निधी योजने अंतर्गत व्यवस्थापन समितीच्या दिनांक २६/०५/२०१५ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत

महाराष्ट्र राज्य वनकर्मचारी कल्याण निधी योजने अंतर्गत व्यवस्थापन समितीच्या दिनांक २६/०५/२०१५ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत या सोबत जोडून पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. बैठकीमध्ये घेण्यात आलेले निर्णय आपले अधिनस्त विभागीय समित्या, महाराष्ट्र राज्य वनकर्मचारी कल्याण निधी यांचे निदर्शनास माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव आणण्यात यावे ही विनंती.

सहपत्र : वरील प्रमाणे

सदस्य सचिव कार्यकारी समिती
महाराष्ट्र राज्य वन कर्मचारी कल्याण निधी
तथा मुख्य वनसंरक्षक (मानव संसाधन व्यवस्थापन)
नागपूर

प्रतिलीपी: प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा महासंचालक, सामाजिक वनीकरण, म.रा. पुणे यांना सहपत्रासह माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सादर.
प्रतिलीपी: प्रधान मुख्य वनसंरक्षक, (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण) म.रा. पुणे यांना सहपत्रासह माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सादर.
प्रतीलिपी :- प्रशासकीय अधिकारी, प्रधान मुख्य वनसंरक्षक, म.रा. नागपूर यांचे कार्यालय यांना सहपत्रासह माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

सही/-
सदस्य सचिव कार्यकारी समिती
महाराष्ट्र राज्य वन कर्मचारी कल्याण निधी
तथा मुख्य वनसंरक्षक (मानव संसाधन व्यवस्थापन)
नागपूर

## दिनांक २६-०५-२०१५ रोजी वनभवन नागपूर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती, महाराष्ट्र राज्य वनकर्मचारी कल्याण निधीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत

महाराष्ट्र राज्य वन कर्मचारी कल्याण निधीच्या व्यवस्थापन समितीची बैठक दिनांक २६/०५/२०१५ रोजी अध्यक्ष, व्यवस्थापन समिती तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सदर बैठकीत खालील व्यवस्थापन समिती सदस्य/नामनिर्देशित सदस्य/केंद्रस्थ अधिकारी उपस्थीत होते.

| अ.क्र. | अधिका-यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. ए. के. सक्सेना | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), म.रा. नागपूर -अध्यक्ष |
| २ | श्री. सर्जन भगत | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), म.रा. नागपूर -सह अध्यक्ष |
| ३ | डॉ. पी. एन. मुंडे | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), म.रा. नागपूर - सदस्य |
| ४ | श्री. यशवीर सिंह | मुख्य वनसंरक्षक (मानव संसाधन व्यवस्थापन) नागपूर - सदस्य सचिव तथा मुख्य वनसंरक्षक (दक्षता व कर्मचारी कल्याण), नागपूर - कोषाध्यक्ष |

व्यवस्थापन समितीवर नामनिर्देशित सदस्य

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचा-यांचे नांव | पदनाम | वनवृत्त |
|---|---|---|---|
| १ | श्री. एस. डी. अत्रे | प्रशासकीय अधिकारी, | नागपूर वनवृत्त |
| २ | श्री. ए. के. पथे | सहाय्यक वनसंरक्षक | प्र.मु.व.सं. यांचे कार्यालय |
| ३ | श्री. व्ही. बी. राऊत | मुख्य लेखापाल | यवतमाळ वनवृत्त |
| ४ | श्री. पी. ए. बांबल | वाहनचालक | चंद्रपूर वनवृत्त |
| ५ | श्री. एस. एस. राठोड | वनरक्षक | प्र.मु.व.सं. यांचे कार्यालय |
| ६ | श्री. गजानन घोडकी | शिपाई | औरंगाबाद वनवृत्त |

नाम निर्देशित केंद्रस्थ अधिकारी

| अ.क्र. | अधिका-यांचे नांव | पदनाम | वनवृत्त |
|---|---|---|---|
| १ | श्री. एस. के. थापलीयाल | विभागीय वन अधिकारी (नियोजन) | नागपूर वनवृत्त |
| २ | श्री. डी. पी. निकम | विभागीय वन अधिकारी (नियोजन) | यवतमाळ वनवृत्त |
| ३ | श्री. एम. एस. भोसले | विभागीय वन अधिकारी (नियोजन) | कोल्हापूर वनवृत्त |
| ४ | श्री व्ही. टी.घुले | विभागीय वन अधिकारी (नियोजन) | अमरावती वनवृत्त |
| ५ | श्री. एस. के. माळवे | विभागीय वन अधिकारी (नियोजन) | नाशिक वनवृत्त |

इत्तर प्रतिनिधी

| अ.क्र. | अधिका-यांचे नांव | पदनाम | वनवृत्त |
|---|---|---|---|
| १ | श्री. डी. डी. तिरपुडे, सहाय्यक संचालक | प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा महासंचालक, सामाजिक वनीकरण, म. रा. पुणे यांच्या वतीने | सामाजिक वनीकरण वृत्त, नागपूर |
| २ | श्री एम. पी. मिस्त्री, लेखापाल | विभागीय वन अधिकारी (नियोजन) यांचे वतीने | धुळे वनवृत्त |
| ३ | श्री. डी. व्ही. उध्दरवार, प्रशासकीय अधिकारी (अतिरीक्त कार्यभार) | विभागीय वन अधिकारी (नियोजन) यांचे वतीने | चंद्रपूर वनवृत्त |

२.०० सर्वप्रथम सदस्य सचिवांनी सदर बैठकीस उपस्थितांचे स्वागत केले. अध्यक्षांचे परवानगीने पदसिध्द सदस्य सचिव यांनी दिनांक २७/०५/२०१४ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांचे अनुषंगाने झालेल्या कार्यवाहीबाबत माहिती विषद केली.

३.०० सदर बैठकीमध्ये नव्याने आलेले खालील विषयावर चर्चा करण्यात आली .

| विषय क्रमांक | संक्षिप्त विषय | झालेली चर्चा व त्या अनुषंगाने घेण्यात आलेला निर्णय | कार्यवाही कोणी करायची |
|---|---|---|---|
| ३.०१ | सन २०१५-१६ या वर्षाकरीता सभासद संख्येत वाढ करणेबाबत | अध्यक्षांनी अश्या सूचना दिल्या की, सन २०१४-१५ या वर्षाकरीता सभासद संख्या २०८०२ एवढी आहे. तथापी सन २०१५-१६ या वर्षाकरीता सभासद संख्या २२००० पर्यंत वाढविण्याचे प्रयत्न करणे योग्य आहे. या दृष्टीने सर्व विभागीय समितीतील अधिकारी यांनी सहकार्य करावे व प्रत्येक विभागीय समितीत कमीत कमी ९० % कर्मचारी/अधिकारी निधीचे सभासद होतील या करीता वनपरिक्षेत्र स्तरावर वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी बैठक आयोजित करावी. तसचे विभागीय समितीस्तरावर सुध्दा बैठक आयोजित करून अधिकारी/कर्मचा-यांना वनकल्याण निधीचे फायदयांबाबत माहिती विषद करावी व तसा अहवाल कार्यकारी समितीकडे सादर करावा. | कार्यकारी समिती/विभागीय समिती |
| ३.०२ | महाराष्ट्र राज्य वनकर्मचारी कल्याण निधीचे माहिती पत्रक प्रकाशित करणे. | अध्यक्षांनी सूचना दिल्या की, वन व सामाजिक वनीकरण विभागातील प्रत्येक अधिकारी/ कर्मचारी जसे शिपाई, लिपीक, लेखापाल, मुख्य लेखापाल, वनमजूर, वनरक्षक, वनपाल, वनक्षेत्रपाल, इत्यादी सर्व संवर्गातील प्रत्येक व्यक्तिंना वनकल्याण निधीबाबत माहिती व त्याचा लाभ कशाप्रकारे मिळतात याची माहिती असावी या दृष्टीने महाराष्ट्र राज्य वनकर्मचारी कल्याण निधीचे २५००० माहिती पत्रक मुद्रांकीत केले आहेत. सर्व वनवृत्त/वनविभागांनी सदरचे माहिती पत्रक या कार्यालयातुन प्राप्त करून घ्यावे व त्यांचे वनवृत्त/वनविभागातील प्रत्येक अधिकारी/कर्मचा-यांना वितरीत करावे. | कार्यकारी समिती/ विभागीय समिती (सर्व) |

| | | | |
|---|---|---|---|
| ३.०३ | लेखा परिक्षण करणेबाबत | बहुतांश वनवृत्तांनी त्यांचे तसेच त्यांचे अधिनस्त असलेले विभागीय समितीचे सन २०१३-१४ पर्यंतचे लेखापरिक्षण अद्याप पूर्ण केले नसल्याने अध्यक्षांनी नाराजगी व्यक्त केली व अश्या सूचना दिल्या की, सर्व वृत्त नियंत्रक अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयात कार्यरत असलेले प्रशासकीय अधिकारी/कार्यालय अधिक्षक यांचेमार्फत त्यांचे तसेच त्यांचे अधिनस्त असलेल्या विभागीय समितीचे सन २००६-०७ ते २०१३-१४ या कालावधीचे लेखा परिक्षण दिनांक ३०/०६/२०१४ पर्यंत पूर्ण करून लेखा परिक्षण अहवाल या कार्यालयास दिनांक १५/०७/२०१४ पर्यंत न चूकता सादर करावा. तसेच सन २०१४-१५ चे लेखापरिक्षण देखील सोबतच करून त्यांचा अहवाल कार्यकारी समितीस सोबतच सादर करावा. तसेच सदर विषय आगामी होणा-या प्रशासकीय अधिका-यांच्या बैठकीत देखील मांडणेबाबत सूचना दिल्या. | कार्यकारी समिती/ वृत्त नियंत्रक अधिकारी (सर्व) |
| ३.०४ | वनकल्याण निधीचे लेख्याचे प्रकाशनाबाबत | सहअध्यक्षांनी असे सूचविले की, शासन निर्णय दिनांक ०९/०८/२००६ मध्ये नमूद केल्यानुसार व्यवस्थापन समितीने मंजूर केलेल्या निधीच्या लेख्या संबंधिचे प्रपत्र आणि कार्यविधी बाबतचा अहवाल वन विभागाच्या वार्षीक प्रशासन अहवालात प्रकाशीत करणे आवश्यक आहे. तरी या बाबत कार्यवाही करावी. | कार्यकारी समिती |
| ३.०५ | सन २०१५-१६ वर्षाकरीता विमा कंपनीची निवड करणे बाबत | सदस्य सचिवांनी असे अवगत केले की, सन २०१५-२०१६ या वर्षाकरीता वन कल्याण निधीचे सभासदांचा दिनांक ११/०८/२०१५ पासून १०/०८/२०१६ पर्यंत एक वर्षाकरीता दुर्घटना विमा काढायचा असल्यामुळे एकुण ०९ विमा कंपन्यांकडून दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यापैकी फक्त २ विमा कंपन्यांकडून (दि. ओरीएन्टल इन्श्योरेंस कंपनी व बजाज अलियांस जनरल इन्श्योरेंस कंपनी). दरपत्रक प्राप्त झाले असुन त्यांचे दरपत्रकांचा तुलनात्मक तक्त्यावरून असे निदर्शनास येते की, दि. ओरीएन्टल इन्श्योरेंस कंपनी नागपूर यांनी Quote केलेले दर हे बजाज अलियांस जनरल इन्श्योरेंस कंपनी यांनी Quote केलेल्या दरांपेक्षा कमी आहेत. मगील वर्षात दि. ओरीएन्टल इन्श्योरेंस कंपनी, नागपूर यांचेकडूनच सभासदांचा विमा उतरविण्यात आला आहे व त्यांनी दिलेली सेवा समाधानकारक आहे. दि ओरीएन्टल इन्श्योरेंस कंपनी नागपूर यांचे दराला | कार्यकारी समिती |

| | | | |
|---|---|---|---|
| | | (१०,००० चे ग्रुप करीता रूपये ३५०/- प्रति सभासद, १५,००० चे ग्रुप करीता रूपये ३४०/- प्रति सभासद व २०,००० चे ग्रुप करीता रूपये ३२५/- प्रति सभासद) व्यवस्थापन समितीने मान्यता प्रदान केली. | |
| ३.०६ | सन २०१५-१६ या वर्षासाठी सभासदांकडून स्विकारायचे वर्गणी व विमा शुल्क निश्चित करणे. | सदस्य सचिवांनी असे अवगत केले की, शासन निर्णय दिनांक ०९/०८/२००६ नुसार वर्ष २००६-०७ नंतर सभासद वर्गणी निश्चित करण्याचा अधिकार व्यवस्थापन समितीला आहे. मागील वर्षी सर्व सभासदांकडून वार्षिक वर्गणी रूपये ५००/- प्रतिसभासद प्रतिवर्ष वसूल करण्यात आले आहे. त्यामध्ये विमा शुल्क रूपये ३०५/- तथा रक्कम रूपये १९५/- सभासद शुल्क म्हणून ठेवण्यात आला आहे. तसेच काही सभासदांच्या मते सदर रक्कम अधिक असलेबाबतची भावना व्यक्त केली जात आहे. तरी सन २०१५-१६ या वर्षाकरीता सभासद शुल्क व विमा शुल्कात वाढ केल्यास सभासद संख्या कमी होवू शकते. त्यामुळे मागील वर्षाप्रमाणे सन २०१५-१६ या वर्षासाठी सुध्दा सभासद शुल्क व विमा शुल्क मिळुन एकुण वर्गणी रूपये ५००/- प्रतिसभासद प्रतिवर्ष एकमुस्त वसूल करणेबाबत व्यवस्थापन समितीने मंजूरी प्रदान केली. | कार्यकारी समिती / विभागीय समिती (सर्व) |
| ३.०७ | ज्या सभासदांचा अपघाती मृत्यू झाला परंतु विमाअभावी त्यांचे कुटुंबियांना विमा राशी मिळू शकली नाही अश्या सभासदांचे कुटुंबियांना एक विशेष बाब म्हणून आर्थिक सहाय्य मंजूर करणेबाबत | सदस्य सचिवांनी असे अवगत केले की खाली नमूद सभासदांचा अपघाती मृत्यू झाला आहे.<br>१) विभागीय वन अधिकारी, चिपळुण यांचे विभागीय समितीतील श्री. अरविंद विठ्ठल तळेकर, वनरक्षक यांचा दिनांक ११/०२/२०१५ रोजी अपघातात मृत्यू झाला. सदर सभासदानी सन २०१४-१५ या वर्षात सभासद व विमा शुल्काची रक्कम संबंधित विभागीय समितीकडे जमा केली होती. परंतु विभागीय वन अधिकारी, चिपळुण यांनी सन २०१४-१५ या वर्षाकरीता ज्या ६५ सभासदांची यादी (श्री. अरविंद विठ्ठल तळेकर, वनरक्षक यांचा समावेश असलेली) दिनांक ०७/०८/२०१४ चे पत्रान्वये या कार्यालयास सादर केली होती. त्यामध्ये जुने सभासदांचे सभासद क्रमांक नमूद केले नव्हते व नवीन सभासदांचे सभासद व नामांकन अर्ज सादर केले नव्हते. त्याचप्रमाणे सभासदांची वर्गणीची रक्कम या कार्यालयास पाठविली नव्हती त्यामुळे स्व. श्री. तळेकर व त्या यादीतील इतर सभासदांचा विमा काढणे शक्य झाले नाही. | विभागीय वन अधिकारी, चिपळूण |

| | | | |
|---|---|---|---|
| | | २ उपवनसंरक्षक, भामरागड यांचे विभागीय समितीतील श्री. असंतु दोबा कोडापे, वनरक्षक यांचा दिनांक ३०/०८/२०१३ रोजी अपघातात मृत्यू झाला. सदर सभासदानी सन २०१३-१४ या वर्षात सभासद व विमा शुल्काची रक्कम सबंधित विभागीय समितीकडे जमा केली होती. परंतु उपवनसंरक्षक, भामरागड यांनी सन २०१३-१४ या वर्षाकरीता ज्या ७५ सभासदांची यादी (श्री. असंतु दोबा कोडापे, वनरक्षक यांचा समावेश असलेली) दिनांक ०७/०९/२०१३ चे पत्रान्वये या कार्यालयास सादर केली होती. सदर यादी या कार्यालयास दिनांक ०३/१०/२०१३ रोजी प्राप्त झाली त्यामुळे स्व. श्री. कोडापे व यादीतील इतर सभासदांचा विमा दिनांक २५/१०/२०१३ रोजी काढण्यात आला होता. तथापी स्व. श्री. कोडापे यांचा मृत्यू दिनांक ३०/०८/२०१३ रोजी म्हणजेच विमा काढण्याआधी झाला असल्यामुळे त्यांचे वारसदारास विमा कंपनीडून विमा राशी प्राप्त करून देणे शक्य झाले नाही.<br><br>सदस्य सचिवांनी सभेत उपस्थितांना अवगत केले की, अश्याच प्रकारचे प्रकरणात मागील वर्षी अपघाती मृत्यू झालेल्या परंतु सभासदांचा विमा नसलेल्या ०३ मृत सभासदांचे वारसदारांना एक विशेष बाब म्हणून आर्थिक सहाय्य प्रत्येकी रूपये ४.०० लक्ष मंजूर करण्यात आले आहे. तरी सदर प्रकरणांमध्ये देखिल त्यांनी सभासद वर्गणी भरलेली असल्यामुळे मृत सभासदांचे कुटुंबाकडे सहानुभूती दाखवून नमूद दोन्ही मृत सभासदांचे वारसदारांना एक विशेष बाब म्हणून आर्थिक सहाय्य प्रत्येकी रूपये ४.०० लक्ष मंजूर करण्यात यावे.<br><br>यावर सभेत असा निर्णय घेण्यात आला की, वर नमूद दोन्ही मृत सभासदांचे वारसदारांना सहानुभूती म्हणून एक विशेष बाब म्हणून आर्थिक सहाय्य प्रत्येकी रूपये ४.०० लक्ष अदा करण्यात यावे. तथापी सदर मृत सभासदांचा विमा न होण्यास जो कोणी कर्मचारी/अधिकारी जबाबदार आढळेल अश्या जबाबदार असलेल्या अधिकारी/कर्मचा-यावर जबाबदारी निश्चित करून त्यांचे विरूध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ अंतर्गत आवश्यक ती कार्यवाही सुरू करण्यात यावी. | उप वनसंरक्षक, भामरागड |

| | | | |
|---|---|---|---|
| ३.०८ | सभासद कर्मचा-यांनी केलेल्या विरतापूर्वक कामासाठी सानुग्रह राशी (प्रोत्साहनात्मक बक्षिस) देणेबाबत | सदस्य सचिवांनी अवगत केले की, शासन निर्णय क्र. एफएसटी ०२/०८/प्र.क्र.१०३/फ-४, दि. ०२/०८/२०११ अन्वये वनकर्मचारी कल्याण निधीच्या सभासदांच्या तसेच त्यांच्या कुटुंबियांच्या उपचाराकरीता रूपये १०,०००/- च्या मर्यादेपर्यंत ९ महिन्यांचे कालावधीपर्यंत बिनव्याजी व नंतर १०% प्रतिवर्ष या दराने वैद्यकीय कर्ज देण्याची तरतुद आहे. तसेच दिनांक ०४/०६/२०११ व दिनांक १८/०४/२०१२ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाचे अनुषंगाने सभासदांचा मृत्यू झाल्यास त्यांचे कुटुंबियांना वन कल्याण निधीतून आर्थिक सहाय्य रूपये २५,०००/- देण्याची तरतुद आहे. तथापी सभासद शासकीय नोकरी बजावतांना अथवा वनसंपत्ती/वन्य प्राण्यांची रक्षा करतांना जखमी झाल्यास त्यांचे कुटुंबियांना आर्थिक सहाय्य देण्याची अद्याप कोणतीही तरतुद नाही.<br><br>तथापी श्री. सतीश देवराम शेंदरे, वनरक्षक, सभासद क्रमांक ३१४८९/२०१४-१५ यांनी गस्ती करतांना मोठया हिंमतीने वन्यप्राण्यांची शिकार करणा-या आरोपीस पकडण्याचे जे धैर्य दाखविले या कार्यवाहीत गोळी लागल्यामुळे गंभीर जखमी सुध्दा झाले. ते शौर्यात्मक कार्य आहे. त्याकरीता त्यांना कार्यकारी समितीने शिफारस केल्यावर एक विशेषबाब म्हणून प्रोत्साहनात्मक बक्षिस रूपये २५,०००/- अदा करण्यात आले आहे. तरी अश्या वन व वन्यप्राण्यांचे संरक्षणार्थ विरतापूर्वक केलेल्या कार्यवाही प्रकरणी जख्मी झालेल्या सभासदांना रूपये २५०००/- प्रोत्साहनात्मक बक्षिस देण्याची तरतूद करण्याचे प्रस्तावित केले.<br><br>**यावर व्यवस्थापन समितीने असा निर्णय घेतला की, "एखादा कर्मचारी शासकीय नोकरी बजावतांना, वन व वन्यप्राण्यांचे संरक्षणार्थ कार्य करतांना जखमी झाल्यास त्यांनी केलेल्या विरतापूर्वक कामासाठी त्याला रूपये २५०००/- प्रोत्साहनात्मक बक्षिस विभागीय समिती स्तरावर अदा करण्यात यावे".** | कार्यकारी समिती/विभागीय समिती |
| ३.०९ | वन कल्याण निधीचे कार्यकारी समितीचे काम | सदस्य सचिवांनी अवगत केले की, दिनांक २७/०५/२०१४ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीच्या बैठकीत असा निर्णय घेण्यात आला आहे की, सन २०१४-१५ या वर्षात ज्या विभागीय समितीत महाराष्ट्र | कार्यकारी समिती |

| | | | |
|---|---|---|---|
| | हाताळणारे कर्मचा-यास मानधन मंजूर करणेबाबत. | राज्य वन कर्मचारी कल्याण निधीचे ८० % किंवा त्यापेक्षा अधिक सभासद असतील त्या विभागीय समितीत वन कल्याण निधीचे काम हाताळणा-या कर्मचा-यास त्या वर्षात प्रतिमाह रूपये २५०/- निधीमधून मानधन स्वरूपात अदा करण्यात येईल. तथापी वनकल्याण निधीचे कार्यकारी समितीचे काम हाताळणारे कर्मचा-यास मानधन देणेबाबत निर्णय घेण्यात आलेला नाही. तरी विभागीय समितीत वन कल्याण निधीचे काम हाताळणा-या कर्मचा-यांप्रमाणे कार्यकारी समितीत वनकल्याण निधीचे काम हाताळणा-या कर्मचा-यास सुध्दा मानधन मंजूर करणेबाबतचा प्रस्ताव समितीपुढे मंजूरीसाठी सादर केला. त्यास समितीने मंजूरी प्रदान करून सन २०१४-१५ या वर्षाकरीता श्री. व्ही. एच. रूईकर, लिपीक यांना एकमुस्त मानधन रक्कम रूपये ३०००/- मंजूर केले. | |

सभेअंती सदस्य सचिव यांनी उपस्थितांचे आभार मानुन सभा संपल्याचे जाहिर केले.

सदस्य सचिव, कार्यकारी समिती
महाराष्ट्र राज्य वनकर्मचारी कल्याण निधी तथा
मुख्य वनसंरक्षक (मानव संसाधन व्यवस्थापन)
नागपूर

मसुदा प्र.मु.व.सं. (व.ब.प्र.) म.रा. नागपूर यांचे मान्यतेने